www.lokmat.com
लोकमत
सांगली, गुरुवार, दि. २८ मे २०२६

# 'पॉलिटेक्निक'ला मिळणार उद्योग उभारणीसाठीचे धडे!

## विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगारक्षमतेचेही प्रशिक्षण मिळणार

**सुशांत घोरपडे**
**लोकमत न्यूज नेटवर्क**

**म्हैसाळ :** राज्यातील पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेला २० मेपासून सुरुवात झाली असून, यंदाच्या वर्षापासून विद्यार्थ्यांसाठी नवीन 'के स्कीम' अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. तांत्रिक शिक्षण अधिक कौशल्याधारित आणि उद्योगाभिमुख करण्यासाठी अभ्यासक्रमात योग, उद्योजकता, भारतीय ज्ञान प्रणाली आणि जीवन कौशल्य यांसारख्या विषयांचा समावेश केला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक शिक्षणच नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास आणि रोजगारक्षमतेचेही प्रशिक्षण मिळणार आहे.

यंदाच्या अभ्यासक्रमात सहा सत्रे आणि एकूण १२० क्रेडिट्सचा समावेश करण्यात आला आहे. तसेच औद्योगिक प्रशिक्षणाचा कालावधी १२ आठवडे करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगातील अनुभव घेण्याची अधिक संधी उपलब्ध होणार आहे. पॉलिटेक्निक पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना थेट अभियांत्रिकीच्या दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळण्याबरोबरच रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतात.



### कुठे आणि कसा करायचा अर्ज?

ज्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी भाग घ्यायचा आहे, त्यांनी तांत्रिक शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज करायचा आहे. यानंतर पडताळणी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे.

प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करावा लागणार असून, दहावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र आहेत. तांत्रिक शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर अर्ज प्रक्रिया सुरू असून, विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### प्रवेश प्रक्रिया व जागा!

दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी २० मेपासून प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यात जवळपास १६ महाविद्यालये असून ४७४४ जागा उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. यामध्ये शासकीय व खासगी महाविद्यालयांचा समावेश आहे.

### नवीन 'के स्कीम' अभ्यासक्रम म्हणजे काय?

या अभ्यासक्रमात उद्योगाभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षण दिले जाणार असून, राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत रचना केलेली आहे. योग, उद्योजकता, जीवन कौशल्य, भारतीय ज्ञान प्रणालीचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे.



**"नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच शारीरिक, मानसिक, व्यावसायिक, शिक्षण घेता येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी वाढतील.**

- संजय परदेशी, प्राचार्य-शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय मिरज.